# सरिता सागर

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**सरिता सागर : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# सरिता सागर

# १

सकाळचे दहा वाजण्याची वेळ होती. गिरगाव नाक्याच्या त्या भागात रहदारीची एकच झुम्मड उडाली होती. ऑफिसात जाण्यासाठी वाहनांची वाट पाहणाऱ्या लोकांच्या रांगा लागलेल्या होत्या. दोन्ही बाजूंचे फूटपाथ माणसांनी खचून गेले होते. मोटरी धावत होत्या. खटारेही खडखडत होते. घोड्याच्या गाड्या कशीबशी वाट काढीत होत्या. रस्ता ओलांडू पाहणारी माणसं वाकडी-तिकडी धावत होती. परोपरीचे आवाज आणि आरोळ्या हवेत उठत होत्या. त्या एकंदर गिचमीड दाटीला काही अर्थ नसल्यासारखं एखाद्या पाहणाऱ्याला वाटण्यासारखं होतं....

त्या दाटीतून वाट काढीत डॉ. सोमणांनी आपली छोटी मॉरिस गाडी 'पराग पुस्तक भांडार'च्या मोठ्या दुकानापुढं उभी केली. गाड्यांची गुंतागुंत आणि माणसांची चेंगट वर्दळ यांतून वाट काढण्यासाठी गाडीचा हॉर्न वाजविता वाजविता ते अगदी त्रासून गेले होते आणि आपल्या लेकीला म्हणत होते, ''दुपारी सवडीनं घेतलं असतं पुस्तक तर काय बिघडलं असतं?'' पण सुरेखा दर वेळेस म्हणत होती, ''दादा, तुम्हांला ते कळायचं नाही.'' आणि दर वेळेस ते उलट म्हणाले होते, ''तुम्ही सारे लोक मूर्ख आहात झालं.'' 'सारे लोक' हे दोन शब्द एका विशिष्ट वर्गाला उद्देशून डॉक्टरांनी वापरले होते. तो वर्ग म्हणजे 'सरिता सागर' नावाच्या लेखिकेच्या कादंबऱ्यांचा वाचकवर्ग. या लेखिकेच्या कादंबऱ्यांनी आताशा लोकांना अगदी वेड लावलं होतं. तिच्या कादंबऱ्या घरोघर वाचल्या जात होत्या. त्या साऱ्या कादंबऱ्या पराग ग्रंथ भांडारतर्फेच प्रसिद्ध होत असत. सारिता सागरची नवी कादंबरी निघाली

की दुकानांच्या दर्शनी भागाच्या एका सबंध खणात तिच्या प्रती मोठ्या आकर्षक रीतीनं मांडल्या जात असत. कादंबरी विकत घेण्यासाठी लोक पराग ग्रंथ भांडारकडे धावू लागत. या साऱ्या लोकांना उद्देशून 'तुम्ही सारे' असं डॉक्टर सोमण वरचेवर म्हणत होते. त्यांचं ते बोलणं ऐकून सुरेखा अशा अर्थानं हसत होती की, बरं, असू दे आम्ही मूर्ख,–गाडी लवकर हाका.

गाडी उभी राहिल्याबरोबर सुरेखा झटकन खाली उतरली व तिच्या मागोमाग डॉक्टरही उतरले. दुकानापुढे खूपच गर्दी झाली होती. तावदानाच्या आत सरिता सागरच्या नव्या कादंबरीच्या प्रती मोठ्या डौलदार रीतीनं आडव्या उभ्या मांडलेल्या होत्या आणि कादंबरीच्या मुखपृष्ठावर जे चित्र छापलेलं होतं त्या चित्राची मूळ भव्य प्रत फ्रेम करून मधोमध ठेवलेली होती. ते चित्र फारच मोहक होतं. तावदानापुढच्या फुटपाथवर गर्दी करून उभ्या राहिलेल्या लोकांना त्या चित्राकडे किती पाहिलं तरी पुरेसं वाटत नव्हतं. आपल्या बापाला त्या गर्दीत ओढून घेऊन सुरेखा म्हणाली, ''बघा तरी ! किती छान आहे, नाही ?'' ते चित्र अतिशय सुंदर असल्याबद्दलची कबुली देणं डॉक्टरांना भागच होतं. तथापि त्यांनी खवचटपणानं टीका केलीच की, ''आताशा कादंबऱ्यांपेक्षा त्यांची मुखपृष्ठंच अधिक चांगली असतात.'' त्यांची ती टीका ऐकून गर्दीतले दोघेतिघे हसले व दुजोरा दिल्याप्रमाणं त्यांनी माना हालविल्या. सुरेखाला राग आला व तिनं फणकाऱ्यानं म्हटलं, ''इतर लेखकांच्या बाबतीत असेल ही गोष्ट खरी, पण सरिता सागरच्या बाबतीत नाही. तिची मागची कादंबरी तुम्ही चोरून दोन वेळा वाचलीत. खरं की खोटं?'' डॉक्टर हसले. त्यांच्या टीकेला ज्यांनी दुजोरा दिलेला होता ते दोघेतिघेही हसले.

गर्दीतून वाट काढून सुरेखा आपल्या बापाबरोबर दुकानात शिरली. काउंटरमागच्या माणसानं तिच्याकडे पाहून विचारलं, ''काय पाहिजे?'' ती म्हणाली, ''सरिता सागरची नवी कादंबरी.'' तो हसला, आणि जवळच्या ढिगातलं एक पुस्तक काढून त्यानं ते तिच्या हाती दिले. तिच्या आजूबाजूस उभ्या राहिलेल्या माणसांनीही त्या कादंबरीच्या प्रतीच विकत घेतल्या होत्या. डॉक्टरांनी पैसे दिले व ते लेकीला म्हणाले, ''झालं? चल.'' पण तितक्यात दुकानाचे मालक त्यांच्या पुढून जाताना त्यांना दिलेस, तेव्हा त्यांनी नमस्कार करून म्हटलं, ''काय अनंतराव? कसं काय म्हणून विचारीतच नाही. कारण ही पुस्तकं कशी फुटाण्यासारखी खपताहेत ते दिसतंच आहे.''



अनंतराव म्हणाले, ''सरिता सागरची नवी कादंबरी निघाली की एखाद्या जत्रेसारखी गर्दी होते बघा. सध्या अगदी 'टॉप'ला आहे ही लेखिका.''

''मोठी भाग्यवान आहे ही बाई म्हणायची.''

''आहे खरी.'' म्हणून अनंतराव एकदम मोठ्यांदा का हसले ते डॉक्टरांना कळलं नाही. त्यांच्या चर्येवरचं आश्चर्य ओळखून अनंतराव म्हणाले, ''वेळ असला थोडा तर जरा इकडे या की डॉक्टर; फार दिवसांनी भेटताहात. या.''

दुकानाच्या दूरच्या कोपऱ्यात अनंतरावांची बसायची जागा होती. तेथे गेल्यावर अनंतरावांनी दोन खुर्च्या सरकवून पुढं केल्या आणि डॉक्टरांनी नको नको म्हटलं तरी चहा मागविला. डॉक्टर अनंतरावांना सांगू लागले, ''आमच्या सुरेखाला भलतं वेड आहे या बाईच्या कादंबऱ्यांचं.''

अनंतराव म्हणाले, ''यांनाच काय, हजारोंना आहे.''

डॉक्टर म्हणाले, ''पण कोणत्याही कादंबरीवर या बाईचा फोटो कसा नसतो? हल्लीच्या लेखकांना आपल्या लहानशा चोपड्यावरसुद्धा आपला फोटो छापायची हौस असते. आता हिच्या पुढच्या कादंबरीवर हिचा फोटो छापा बुवा अनंतराव.''

''ही सूचना तुम्हीच प्रथम नाही करीत. किती तरी वाचकांनी ही केली आहे.''

''मग वाचकांची ही वाजवी मागणी तुम्ही पुरी का नाही करीत? मलासुद्धा फार इच्छा आहे या बाईचा फोटो पाह्यची.'' सुरेखा हसली तेव्हा ते पुढे म्हणाले, ''हसतेस काय? खरंच ! या बाईची व्याख्यानं बिख्यानंही कुठं होत नाहीत. बोलणारी पटाईत नाही वाटतं?''

अनंतराव पुन्हा मोठ्यांदा हसले.

डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही मघापासून असे हसताहा का? काही तरी विशेष अर्थ आहे तुमच्या हसण्याचा.''

''होय, आहे.''

''मग सांगा की.''

चहाचा कप संपवून दूर टेबलावर ठेवीत अनंतराव म्हणाले, ''मोठी ऐकण्यासारखी गंमत आहे डॉक्टर. मी सहसा कुणाला सांगत नाही. तुम्हांला सांगण्याची तरी आज मला का लहर आली आहे कुणास ठाऊक ! आली आहे खरी. पण तुम्ही कुणाजवळ वाच्यता करू नका. सरिता सागर ही व्यक्ती पुण्यामुंबईत

नाही. ही व्यक्ती कुठल्याही सभेत भाषण करीत नाही, एवढंच नव्हे तर चार-चौघात मिसळतही नाही किंवा समाजात उघडपणं वावरतही नाही. शहरापासून, इतकंच नव्हे, महाराष्ट्रापासून दूर, समाजापासून अगदी दूर, कुणाचाही संपर्क लागू न देता ही व्यक्ती एकाकी आयुष्य कंठीत असते. ती कोणत्या गावी कशी, कुठं राहते ते फारच थोड्या लोकांना माहीत आहे. जिनं लिहिलेल्या कादंबऱ्या हजारो घरांतली माणसं मोठ्या रुचीनं वाचतात त्या व्यक्तीला कोणी नात्याची माणसं नाहीत, कुणी इष्टमित्र नाहीत. अगदी निवान्तपणानं, एकलकोंडेपणानं एका बाजूला दूर ती राहते...''

डॉक्टरांनी मध्येच विचारले, ''का? असं का?''

अनंतराव म्हणाले, ''त्याच्यामागं मोठा इतिहास आहे. तो सांगायचा झाला तर एक पुस्तक लिहावं लागेल. आणि ते पुस्तक कदाचित लवकर लिहिलं जाईलही. कारण मी गेल्या दोन वर्षांपासून सारखा लकडा लावलेला आहे आत्मचरित्र लिहा म्हणून. ते चरित्र लिहिलं जाईल तेव्हा एकाहून एक सरस अशा कादंबऱ्या लिहिणारी ही व्यक्ती संन्याशासारखी एकटीच का राहते त्याची कारणं लोकांना कळतील. पण आज ही व्यक्ती महाराष्ट्रापासून दूर बैराग्याचं एकाकी जीवन जगत आहे हेदेखील कुणाला माहीत नाही....''

सुरेखा मध्येच उद्गारली, ''माहीत नाहीच, पण कुणाला सांगितलं तर खरंदेखील वाटायचं नाही.''

अनंतराव म्हणाले, ''कुणला सांगायचं नाहीच मुळी.''

''हो, ते तर झालंच, पण आपलं म्हटलं. ज्या लेखिकेच्या कादंबरीतली माणसं मोठ्या आनंदानं समाजात मिसळतात, चैन करतात, सामाजिक जीवनाचा मनसोक्त उपभोग घेतात ती व्यक्ती स्वत: मात्र या आनंदापासून अलिप्त राहते हे कुणाला खरं वाटायचं नाही.''

''नाहीच वाटायचं हो.'' अनंतराव म्हणाले, ''पण यापेक्षाही जिचा चमत्कार तुम्हांला वाटेल अशी गोष्ट अजून पुढंच आहे.''

डॉक्टर म्हणाले, ''आं? काय म्हणता? सांगा, सांगा.''

'कान करा इकडे' अशा अर्थानं डावा पंजा हालवून पुढं झुकून डॉक्टरांच्या कानाशी तोंड नेऊन अनंतराव म्हणाले, ''अहो, या कादंबऱ्या लिहिणारी व्यक्ती बाई नाही ! पुरुष आहे पुरुष ! सरिता सागर हे खोटं टोपणनाव आहे !''



डॉक्टर म्हणाले, ''आता मात्र तुम्ही कमाल केलीत अनंतराव. या लोकप्रिय कादंबऱ्या लिहिणाऱ्या बाई आहेत तरी कशा ते डोळ्यांनी बघावं अशी साधी उत्सुकता पूर्वी वाटत असे. पण आता तुमच्या तोंडच्या या एकाहून एक अशा आश्चर्यकारक गोष्टी ऐकल्यानंतर त्या उत्सुकतेला अगदी उधाण आलं आहे बघा...''

''या कादंबऱ्या लिहिणारी व्यक्ती बाई नसून पुरुष आहे असं कळल्यावरसुद्धा तिच्याविषयीची तुमची जिज्ञासा कायम आहे.''

''अहो कायमच नाही, दसपटीनं वाढली आहे. हे लेखक कुठल्या गावी असतात ते सांगाल तर खरोखरच मी त्यांच्या भेटीला जाईन.''

''जाऊन काही उपयोग नाही डॉक्टर.'' अनंतराव म्हणाले, ''ते कुणाचीही भेट घेत नाहीत. त्यांचं नाव चैतन्य. आडनाव सागर. त्यांचा संपूर्ण पत्ताही मी तुम्हांला देईन. पण भेटीची इच्छा प्रदर्शित करणारं पत्र तुम्ही त्यांना लिहिलंत तर त्यांचं उत्तर तुम्हांला येईल की, मी कुणालाही भेटत नाही, माफ करा.''

''कुठं राहतात ते? कोणत्या गावी?''

''सांगतो. मडगावपासून वॉस्कोपर्यंतचा मोठा रस्ता तुम्हांला माहीत आहे ना? नाही?...कधी गोव्याला गेला होता की नाही? नाही ?....''

✦✦✦

## २

तुम्ही कधी गोव्यात गेलात तर मडगावपासून वॉस्कोपर्यंतच्या रस्त्यानं एकदा तरी चक्कर टाकल्यावाचून राहू नका. फारच सुंदर रस्ता आहे तो. तुमची स्वत:ची गाडी असेल तर ताशी पन्नास मैलांच्या वेगानं तुम्हांला गाडी मारता येईल. कारण रस्ता डांबरी आहे, आणि बहुधा चांगल्या स्थितीत राखलेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस मोठमोठी झाडं आहेत. कित्येक ठिकाणी तर फांद्यांच्या कमानींखालून तुमची गाडी जाईल. कोठे फार उंच चढण नाही, किंवा मोठी उतरती नाही; परंतु रस्ता सारखा एकाच सपाटीनं गेला आहे असंही नाही. रस्त्याला जागोजाग छोटे छोटे फुगे आलेले आहेत, आणि ठिकठिकाणी रस्ता खोलगट झालेला आहे. त्यामुळं ताशी पन्नास मैलांच्या वेगानं जाणारी गाडी वर खाली झोके घेत चालल्यासारखी वाटते, आणि मोठी मजा येते. नुकताच पावसाळा संपून गेला आहे, अशा सुमाराला तुम्ही गेलात तर रस्त्याच्या दोन्ही अंगांना निसर्गाची शोभा अगदी बहरून गेलेली तुम्हांला दिसेल. परंतु हा विवक्षित मोसम तुम्ही साधला नाहीत तरी फारसं बिघडणार नाही. कोणत्याही दिवसांत या रस्त्यानं गाडीत किंवा पायी चालत तुम्ही गेलात तरी तुमच्या डोळ्यांचं पारणं फिटावं अशा तऱ्हेचं सृष्टिसौंदर्य चहूकडे पसरलेलं तुम्हांला आढळेल. अर्ध्या पाऊण मैलाच्या अंतरावर या रस्त्याला लागून छोटी छोटी गावं वसलेली आहेत. त्या त्या गावांच्या छोट्याशा बाजारातूनच रस्ता जातो. चहॉ-कॉफीची दुकानं, किराणा माल, कापडचोपड अशांची दुकानं, दारूचा पिठा, ख्रिस्ती चर्च, हिंदू देवालय, अशी या सगळ्या गावांची ठराविक मांडणी तुमच्या ध्यानात येईल. एका



गावाहून दुसरं गाव तुम्हांला निराळं वाटणार नाही, पण प्रत्येक गाव मोठं सुबक आणि मनोहर वाटेल. रस्ते स्वच्छ दिसतील, केर-कचरा, घाण कुठं आढळणार नाही, माणसांचा रंग बहुधा काळाच दिसेल, परंतु नाकी डोळी ती मोठी देखणी वाटतील. बायकांच्या अंगावर रंबीबेरंगी वस्त्रं आणि मोठ्या आकर्षक रीतीनं बांधलेल्या केसांत तऱ्हेतऱ्हेच्या रंगांची नाजुक फुलं पाहून तुम्हांला मोठा हर्ष होईल. एखाद्या सुंदर उपवनातून आपण चाललो आहोत असा भास तुम्हांला होईल...

मडगावाहून तुम्ही निघालाच की चार-पाच गावं मागं टाकल्यावर एके ठिकाणी रस्त्याला लागूनच एक मोठं चर्च असलेलं तुम्हांला दिसेल. या चर्चला लागूनच आंब्याच्या झाडांची गर्द राई आहे. या गावाचं नाव 'पालव'. चर्चच्या समोर एक लहानशी शाळेची इमारत आहे. या शाळेच्या डाव्या अंगानं एक छोटासा रस्ता गेलेला आहे. त्या रस्त्यानं एक दोन फर्लांग गेलं की आणखी एक छोटा रस्ता फुटतो. ज्या ठिकाणी तो फुटतो त्या ठिकाणी 'हा रस्ता रहदारीचा नाही' अशी पाटी आहे. या पाटीला न जुमानता तुम्ही त्या छोट्या रस्त्यानं गेलात तर सुमारं पन्नास कदम चालल्यानंतर तुम्हांला थांबावं लागेल. कारण समारेच एक भलं मोठं फाटक तुम्हांला दिसेल व ते बंद करून त्याच्या कडीला कुलूप घातलेलं तुम्हांला आढळेल. एखाद्या किल्ल्याच्या तटबंदीसारखी सात आठ फूट उंचीची दगडी भिंत फाटकाच्या दोन्ही अंगांनी काहीशी वर्तुळाकार गेलेली आहे. या भिंतीपलीकडची आतली एकही वस्तू तुम्हांला दिसणार नाही. 'सरिता सागर' या टोपणनावानं कादंबऱ्या लिहिणारे चैतन्य सागर यांचं हेच निवासस्थान...

पुण्या-मुंबईच्या लोकांना सरिता सागर ही व्यक्ती खरोखर कोण आहे, व ती कुठं राहते ते माहीत नव्हतं; ज्या पालव गावात ती राहात होती त्या गावच्या लोकांना ती व्यक्ती या किल्ल्यासारख्या बंगल्यात राहते यापलीकडे काही माहीत नव्हतं. त्या बंगल्याचा श्रीमंत मालक गावकऱ्यांच्या दृष्टीस सहसा पडत नसे. त्याच्या लेखनव्यवसायाची कुणालाही कल्पना नव्हती. त्याचं संपूर्ण नावदेखील टपालखात्याच्या लोकांखेरीज इतर किती लोकांना माहीत होतं कुणास ठाऊक? सामान्य गावकऱ्यांत चैतन्यचा उल्लेख होत असे तो 'किल्ल्यातला नवा साहेब' या नावानंच. 'नवा' हा शब्द लोक वापरीत त्याचं कारण असं की हा किल्लेवजा बंगला पूर्वी एका पोर्तुगीज साहेबाच्या मालकीचा होता. या साहेबाच्या तीन पिढ्या या